महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
**सहसंचालक, लेखा व कोषागारे,**
**अमरावती विभाग, अमरावती, पिन - ४४४६०२**

E-mail : jd-amravati@mah.gov.in

**दूरध्वनी क्र. : ०७२१ - २६६८११७** **फॅक्स : ०७२१ २६६८१७२**

---

क्र/न.क्र./आस्था-३/कनिष्ठ लेखापाल-भरती/२०२४/ 364/ दिनांक-२७.०५.२०२५

प्रति,
सहसंचालक (माहिती तंत्रज्ञान)
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य मुंबई

विषय :- कनिष्ठ लेखापाल पदभरती च्या अनुषंगाने दि.02.05.2025 रोजी तीन Shift मध्ये घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेच्या उत्तरतालीकेची लिंक संचानलायाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की सहसंचालक लेखा व कोषागारे अमरावती विभाग अमरावती यांचे कडुन कनिष्ठ लेखापाल या पदाची परीक्षा दि.02.05.2025 रोजी तीन shift मध्ये ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली असुन T.C.S. व्दारे उत्तरपत्रीकेची लिंक या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली आहे.त्या अनुषंगाने सदरची लिंक व सुचना पत्र संचालनालयाच्या https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर आज दि.27.05.2025 रोजी प्रसिध्द करावी.सदर लिंक दि.27.05.2025 रोजी संध्याकाळी 05.00 वाजेपासुन ते दि.30.05.2025 रोजी संध्याकाळी 05.00 वाजेपर्यंत कार्यान्वीत राहील. करिता विनंती करण्यात येत आहे.

सहपत्र-सुचना पत्रक

आपला विश्वासु,

(प्रिया वि. तेलकुंटे)
सहसंचालक,
लेखा व कोषागारे, अमरावती

प्रत:-संचालक,लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य मुंबई याना पुढिल कार्यवाहीस्तव.

Scanned with OKEN Scanner

**सुचनापत्र जाहिरात**
**क्र.०१/२०२५ दि.२६.०१.२०२५ चे अनुषंगाने**
**उत्तरतालीका /Answer Key व हरकत अर्जाबाबत सुचना.**

सहसंचालक, लेखा व कोषागारे,अमरावती विभाग अमरावती च्या आस्थापनेवरील गट -क संवर्गातील कनिष्ठ लेखापाल या पदाची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात क्र. ०१/२०२५ दि. २६.०१.२०२५ अन्वये प्रसिध्द केलेल्या जाहीराती नुसार अर्ज केलेल्या अर्हताधारक उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा दि.०२.०५.२०२५ रोजी तीन shift मध्ये घेण्यात आलेली होती.

कनिष्ठ लेखापाल या पदांच्या उत्तरतालीकेची / (ANSWER KEY link ) https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर **careers** या मेनुमध्ये दि.२७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० पासुन ते दि.३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उमेदवारांनी वरील प्रमाणे लिंक वर अर्ज क्रमांक/(**Application no**) व ऑनलाईन अर्ज भरतेवेळी वापरलेला पासवर्ड/PASSWORD वापरुन उत्तरतालिका (ANSWER KEY) तपासुन घ्यावी तसेच (OBJECTION FORM) Live करण्यात येत आहे.

कनिष्ठ लेखापाल या पदांच्या ऑनलाईन परिक्षेचे प्रश्न अथवा उत्तराबाबत उमेदवारांच्या हरकती/आक्षेप असल्यास दि.२७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपासुन ते दि.३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत योग्य त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह उत्तरतालिकेसोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या हरकत अर्जात पाठविण्यात याव्यात .प्रत्येकी एका हरकत/आक्षेपाकरिता रु.१०० शुल्क आकारण्यात येत आहेत.सदरचे शुल्क उमेदवाराने **UPI,/ इंटरनेट बँकींग,क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्डव्दारे भरावे**. विहित मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती /आक्षेप यांची दखल घेतली जाणार नाही.याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(प्रिया वि. तेलकुंटे)
सहसंचालक,
लेखा व कोषागारे, अमरावती

Scanned with OKEN Scanner